# भ्रमंतीतून जगाशी मैत्री करण्याची उमेद

## दिवाण दांपत्य; लग्नाच्या वाढदिवसानिमित्त १८ देशांचा मोटारसायकलवरून प्रवास

**फलटण, ता. ७ :** "स्वत:चे जगाशी नाते जोडण्याबरोबरच विवाहाच्या १८ व्या वाढदिवसानिमित्त १८ देशांची मोटारसायकलवरून केलेल्या भ्रमंतीतून जगाशी मैत्री हेच सूत्र जगण्याला अधिक उमेद देऊन गेले," असे मत मानस दिवाण व अनुराधा दिवाण या दांपत्याने व्यक्त केले.

श्री सद्‍गुरू प्रतिष्ठानच्या वतीने दिवाण दांपत्याचा सत्कार प्रतिष्ठानचे अध्यक्ष दिलीपसिंह भोसले व मधुबाला भोसले यांच्या हस्ते महाराजा मंगल कार्यालयात केला. त्या वेळी बोलताना दिवाण दांपत्याने जग प्रवासाचे विश्व उलगडून दाखविले.

मूळ फलटणच्या असलेल्या पूर्वाश्रमीच्या अनुराधा भोसले या आसाममधील गोहाती येथील दिवाण कुटुंबात स्नुषा म्हणून गेल्या. मानस व अनुराधा दिवाण यांनी विवाहाच्या १८ व्या वाढदिवसानिमित्त संकल्प करून १८ देशांचा प्रवास मोटारसायकलवरून करून आपले विचार विश्व भ्रमण करण्याबरोबरच जगाशी नाते जोडण्याचा यशस्वी प्रयत्न केला. ते म्हणाले, "आम्ही दोघेही उच्च पदवीधर असून, परदेशात उच्चपदावर कार्यरत होते. तथापि जग जवळ करण्याबरोबरच तेथील जीवनशैली व लोकजीवन पाहावे, की जेणेकरून आपले विचार प्रगल्भ होण्याबरोबरच जगाशी नाते जोडण्याच्या विचारातून आम्ही दोघेही मोटारसायकलवरून १८ देशांच्या प्रवासाला निघालो. २० हजार किलोमीटरचा प्रवास १०० दिवसांत पूर्ण केला. यामागे केवळ जिद्द व जीवनाचा आनंद घेण्याचा संकल्प ही भावना आहे. युरोप, आशिया खंडातील देश पाहताना तेथील नागरिकांनी केलेले कौतुक आम्हाला पुढील प्रवासासाठी बळ देत गेले. देशादेशातील विविधता पाहताना आम्हालाही आमच्या अस्तित्वाची जाणीव झाली."



**फलटण : दिवाण दांपत्याचा सत्कार करताना श्री. व सौ. दिलीपसिंह भोसले व रवींद्र बेडकीहाळ.**